# सूचनापत्रक

महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांमध्ये मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ८८(५) आणि (६) व महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ ८६,८७,८९ नुसार महाराष्ट्र राज्यातील माल वाहतुक परवाना धारकांना गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी एकुण खालील निर्देशिलेल्या उपलब्ध जागासाठी शिफारस पत्रे दयावयाची आहेत. त्यासाठी महाराष्ट्रातील इच्छूक परवानेधारकांकडून सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कडे विहित नमुन्यात दिनांक ०९/११/२०१५ पासून अर्ज मागविण्यात येत आहेत. उपलब्ध जागांच्या (८६९) संख्येच्या अधीन राहून प्रथमास प्रथम पसंती ( FIRST COME FIRST SERVE ) या तत्वाचे पालन करून प्रतिस्वाक्षरी परवान्यासाठी शिफारस पत्रे दिली जातील.

| प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारस करावयाचे राज्य | प्रतिस्वाक्षरीसाठी कोटा | प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारस पत्राकरिता एकूण उपलब्ध जागा. |
|---|---|---|
| गुजरात | ८६९ | ८६९ |

शिफारस पत्र मिळण्यासाठी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.

**१) प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.**

**२) अर्ज सादर करताना वाहनाची सर्व वैध कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावी लागतील.**

**३) अर्जदाराने अर्जासोबत स्वतःचे छायाचित्र असलेल्या ओळखपत्राची छायांकित व साक्षांकित प्रत जोडावी.**

**४) गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी परिवहन आयुक्त, गुजरात राज्य सुरत यांच्या कार्यालयात १ वर्षाचा कर आगावू भरावा लागेल.**

**५) गुजरात राज्यासाठी प्रतिस्वाक्षरी कर रु.५५००/- इतका आहे.**

**६) पोष्टाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**७) अर्जदाराने संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या कडून परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्या नावाने गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरी मिळण्याबाबतचे शिफारस पत्र आणावे.**

विहित नमुन्याचे अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय व महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून मिळू शकतील. अर्जाचे शुल्क रु.५ इतके आहे.

पुर्णत भरलेला अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत ३ रा मजला डॉ आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे ( पुर्व ) मुंबई.४०००५१. येथे कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत अर्जाचे शुल्कासह **प्रत्यक्ष सादर** करावेत.

विहीत नमुन्यातील पुर्ण भरलेले, निर्देशित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांचाच प्रतिस्वाक्षरीच्या शिफारशीसाठी विचार केला जाईल. अपूर्ण व विनाशुल्क प्राप्त झालेले अर्ज नामंजूर केले जातील.

**सचिव**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

क्र.८६९/का-५/प्रस्वाशिप/पआका/१५/जा.क्र. 12213
परिवहन आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय इमारत ३ रा व ४ था मजला,
शासकीय वसाहत वांद्रे ( पुर्व )
मुंबई-४०००५१.
दिनांक 26 OCT 2015